प्रेसनोट

जा.क्र. कोजिप/साप्रवि/कावी/१२/जयंती/२०१७
सामान्य प्रशासन विभाग जि.प. कोल्हापूर
दिनांक ३१ /१० /२०१७

प्रति,
जिल्हा माहिती अधिकारी
कोल्हापूर

**विषयः- सरदार वल्लभभाई पटेल याची जयंती व स्वर्गीय इंदिराजी गांधी यांची पुण्यतिथी जिल्हा परिषदेमध्ये साजरी**

**खालील प्रेसनोट सर्व लोकप्रिय दैनिकामधून प्रसिध्द करणेत यावी.**

**सरदार वल्लभभाई पटेल याची जयंती व स्वर्गीय पंतप्रधान, इंदिराजी गांधी यांची पुण्यतिथी** दिनांक ३१ /१०/२०१७ इ . रोजी जिल्हा परिषदमध्ये सकाळी ११.०० वाजता साजरी करणेत आली. सरदार वल्लभाई पटेल यांची जयंती राष्ट्रीय एकता दिवस म्हणून साजरा करणेत आला. तसेच वल्लभभाई पटेल यांचे जयंती निमित्त सकाळी राष्ट्रीय एकता दौड दसरा चौक ते शिवाजी पुतळा अशी आयोजित करणेत आली होती. त्यावेळी राष्ट्रीय एकात्मता दिवसाचे औचित्य साधून सर्वानी राष्ट्रीय एकतेची शपथ घेतली.त्याप्रसंगी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कुणाल खेमनार व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.इंद्रजित देशमुख यांचे हस्ते सरदार वल्लभभाई पटेल व स्वर्गीय इंदिराजी गांधी याचे हस्ते फोटोस पुष्पहार अर्पण करण्यात आला . याप्रसंगी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. इंद्रजित देशमुख यांनी स्वर्गीय इंदिराजी गांधी व सरदार वल्लभभाई पटेल यांचे प्रशासन आणि राष्ट्रीय एकता दिवस याबाबत **मार्गदर्शन केले. तसेच** श्री. बी.पी. माळवे यांनी सूत्रसंचालन केले.

याप्रसंगी उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री. राजेद्र भालेराव व मुख्य लेखा व वित्त अधिकारी श्री. संजय राजमाने, कृषि अधिकारी श्री. चंद्रकांत सुर्यवंशी उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी राहूल कदम व श्री. राजेद्र नागणे , सर्व विभागाचे कक्षअधिकारी , अधिक्षक, कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते.

तरी सदरची बातमी आपले मार्फत लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करणेत यावी.

उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र. )
जिल्हा परिषद कोल्हापूरकरीता